**रे.के.नं. ७८/२०१८**
**नि.क्र.६२/क**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ याची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | महेश भिकारीलाल चंद्रा |
| वय | - | ६१ वर्षे |
| व्यवसाय | - | सेवानिवृत्त |
| राहणार | - | मयंकपुरी, उत्तरप्रदेश |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पवार यांच्याद्वारे</u>**

१. मी घटनेच्यावेळी भारत सरकार च्या डायरेक्टटोरेट ऑफ प्लान्ट प्रोटेक्शन या विभागात जेएनपीटी येथे कार्यरत होतो. माझे पद प्लान्ट प्रोटेक्शन ऑफीसर असे होते. कस्टम विभागाचे डेप्युटी कमीशनर आनंद गोखले यांनी माझे सहकारी राहूल मिश्रा यांना नोव्हेंबर २०१६ मध्ये फोन केला होता. त्यांनी फोनवर जेकेसी या कंपनीचे सर्टीफिकेट वर असलेले नाव बरोबर नसल्याचे सांगितले होते. त्या प्रमाणपत्राचा क्रमांक ६१९९३२ असा होता. मी जेएनपीटी येथे प्लान्ट प्रोटेक्शन ऑफिसर म्हणून नोव्हेंबर २०१६ पासून जानेवारी २०१७ या कालावधीत होतो. त्या प्रमाणपत्रा संबंधी गोखले यांनी राहूल मिश्रा यांचे सोबत ते प्रमाणपत्र बरोबर नसल्या संबंधी चर्चा केली. त्यानंतर राहूल मिश्रा यांनी ते प्रमाणपत्र सीस्टीमद्वारे तपासून पाहिले असता, ते प्रमाणपत्र मिळण्यासाठी आमचेकडे कधीही अर्ज आलाच नव्हता, असे अढळून आले. ते प्रमाणपत्र हे एका बदाम संबंधी असलेल्या कन्साईनमेंट चा वापर करून तयार केलेले होते. त्याप्रमाणपत्रावर माझे नावाची सही नमूद होती, परंतू ती सही मी केलेली नव्हती. त्यानंतर मला पोलीस ठाण्यात विचारपूस करण्यासाठी बोलाविले होते. त्या प्रमाणपत्रावर लावलेला स्टॅम्प मात्र बरोबर असल्याचे आढळून आले होते. आता मला ते प्रमाणपत्र दाखविले त्यावर माझे नावाची असलेली सही ही माझी नाही. सदर प्रमाणपत्र हे निशाणी क्र. P3/PW1 कडे आहे.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. योगेश गांगण यांच्याद्वारे...</u>**

२. वादातील प्रमाणपत्राद्वारे आयातदारास फायदा होणार होता. मला नायर साहेबांनी जबाब नोंदविण्यासाठी बोलाविले नाही. हे मला माहित नाही की, पोलीस केस होण्यापूर्वी सदर गुन्हयाचा तपास कस्टम विभागाचे श्री.नायर यांचेकडे होता. हे म्हणणे खरे आहे की, वादातील प्रमाणपत्र कोणी, कसे व कधी तयार केले, याची मला माहीती नाही. पोलीसांनी मला जबाब घेण्यासाठी बोलाविल्याची तारीख मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला वादातील प्रमाणपत्रासंबंधी दि. १६/११/२०१६ रोजी श्री. मिश्रा यांचेकडून पहिल्यांदा समजले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर अंदाजे ९ महिन्यांनी मी पोलीसांना जबाब दिला. हे मी खात्रीने सांगू शकत नाही की, माझ्या जबाबामध्ये लिहिलेली तारीख दि. २७/०८/२०१७ ही बरोबर आहे कींवा नाही. मी पोलीसांना दोन ते तीन वेळा जबाब दिला. प्रत्येक वेळी पोलीसांनी माझा जबाब नोंद करुन घेतला व एक वेळा माझी सही सुद्धा घेतली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

उरण, (एस.पी. वानखडे )

दिनांक – २५/११/२०२५ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.२ उरण